
# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
# पुणे महानगरपालिका
# कंत्राटी पदभरती मार्गदर्शक सूचना


राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार मंजुर कंत्राटी पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता व १५ वा वित्त आयोग या कार्यक्रमामधील विविध रिक्त पदांची जाहिरात https://pmcuhwcrecruitment.maha-arogya.com व https://www.pmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना/माहिती पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत. खालील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवाराची पात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदाकरीता पात्र आहे असा अर्थ होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी व/वा निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**क) <u>अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचना –</u>**


१. अर्ज भरण्यासाठी उमेदवाराने https://pmcuhwcrecruitment.maha-arogya.com या संकेतस्थळावर जाऊन “ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी येथे क्लिक करा (Click here to Fill Online Application Form)” या लिंकवर क्लिक करावे.



२. लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्जदारासाठीच्या डॅशबोर्ड मध्ये उमेदवाराने भ्रमणध्वनी क्रमांक टाकावा. नवीन अर्जासाठी OTP टाकण्याची गरज नाही मात्र त्यानंतर OTP टाकून डॅशबोर्ड मध्ये प्रवेश करता येईल.





३. अर्ज भरण्यासाठी खालील नमूद केल्यानुसार एकूण ८ टप्पे असून डॅशबोर्ड मध्ये प्रत्येक टप्प्याची स्थिती उपलब्ध असेल.





| | |
|---|---|
| टप्पा-3 : अनुभवाचा तपशील (Step-3 : Details of Experience Information) | अपूर्ण (Incomplete)<br>टप्पा-3 अपूर्ण असेल तरीही आपण आपला अर्ज सबमिट करू शकता (You can still submit your application even if stage-3 is Incomplete) |
| टप्पा-4 : कोणत्या पदांसाठी अर्ज ? (Step-4 : Application for which Posts ?)<br>अर्जदार एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करू शकतात (Applicant can apply for more than one Post) | अपूर्ण (Incomplete) |
| टप्पा-5 : कागदपत्रे / प्रमाणपत्रे अपलोड करणे (Step-5 : Uploading of Documents / Certificates) | अपूर्ण (Incomplete)<br>1) रुंदी 100 पिक्सेल आणि उंची 140 पिक्सेल असलेला अर्जदाराचा फोटो (Applicant Photo having Width 100 Pixel and Height 140 Pixel)<br>2) रुंदी 100 पिक्सेल आणि उंची 50 पिक्सेल असलेली अर्जदाराची स्वाक्षरी (Applicant Signature having Width 100 Pixel and Height 50 Pixel)<br>3) आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅन कार्ड / पासपोर्ट सारखा फोटो आयडी (Photo ID Like Aadhar Card / Driving License / PAN Card / Passport)<br>4) वयाचा पुरावा - शाळा सोडल्याचा दाखला (Proof of Age - School Leaving Certificate)<br>5) जातीचा दाखला (Caste Certificate)<br>6) जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate)<br>7) अद्यावत नॉन क्रीमी लेयर प्रमाणपत्र (Updated Non Cremy Layer Certificate)<br>8) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)<br>9) एमएस-सीआयटी किंवा समकक्ष कोर्स प्रमाणपत्र (MS-CIT or Equivalent Course Certificate)<br>10) लहान कुटुंब घोषणापत्र (Small Family Declaration)<br>11) अनुभव टॅबमध्ये नमूद केलेली सर्व अनुभव प्रमाणपत्रे एकाच पीडीएफ फाइलमध्ये अपलोड करा (Upload All Experience Certificates which are mentioned in Experience Tab in Single PDF File)<br>12) अर्जातील नावाचा पुरावा एस. एस. सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता (Proof of name in application form (S.S.C. or equivalent Educational Qualification)<br>13) राष्ट्रीय आरोग्य मिशन आस्थापनेवरील कर्मचारी असल्याचा पुरावा (Proof of being an Employee of the National Health Mission establishment )<br>14) या व्यतिरिक्त पात्रतेशी इतर कोणतेही संबंधित दस्तऐवज (Apart from this any other Documents related to Eligibility)<br>15) शैक्षणिक पात्रता टॅबमध्ये नमूद केलेली सर्व बोर्ड/पदवी प्रमाणपत्रे एकाच पीडीएफ फाइलमध्ये अपलोड करा (Upload All Board/Degree Certificates which are mentioned in Educational Qualification Tab in Single PDF File)<br>( टीप : टप्पा ५ अपूर्ण असेल तरीही उमेदवार त्यांचा अर्ज प्रस्तुत करू शकेल परंतु उमेदवाराने त्याने निवडलेल्या पदासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे अन्यथा उमेदवाराचा अर्ज बाद करण्यात येईल. [ Note : Even if stage 5 is incomplete candidate can submit their application but candidate must upload necessary documents / certificates related to the post selected by him otherwise candidate's application will be rejected.]) |
| टप्पा-6 : अर्ज फीचा ऑनलाइन भरणा (Step-6 : Online Payment of Application Fees) | पूर्ण (Completed)<br>अर्ज शुल्क प्राप्त झाले (Application Fees Received) 0<br>भरण्यासाठी अर्ज फी शिल्लक (Application Fees Balance to Pay) 0<br>महत्वाची नोंद : जर आपण रक्कम ऑनलाइन अदा केलेली असेल व ती पोर्टलला दिसत नसेल तर कृपया एक तास वाट पाहावी (Important Note : If you have paid the amount online and it is not visible on the portal, please wait for one hour) |




| | |
|---|---|
| टप्पा-7 : ऑनलाइन अर्ज प्रस्तुत करा (Step-7 : Submit Online Application) | अपूर्ण (Incomplete) |
| टप्पा-8: प्रस्तुत केलेल्या अर्जाची प्रिंटआउट घ्या (Step-8 : Printing of Submitted Application) | |

तुमची शंका/तक्रार काही असेल तर येथून मांडा (Raise your Query/Grivance if any from Here)

## ख) अर्ज करावयाचे टप्पे-

### टप्पा-१: अर्जदाराची सामान्य माहिती

या टप्प्यामध्ये अर्जदाराने स्वत:ची सामान्य माहिती नोंदवावी. सामान्य माहिती नोंदविल्यानंतर अर्जदारास अर्जाचा अर्ज क्रमांक मिळणार आहे.



राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
पुणे महानगरपालिका

बाहेर पडणे (Logout)

**जाहिरात क्रमांक : PMC/12/2023 साठी विविध पदांच्या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज**
**(Online Application for Recruitment of Various Posts for Advertisement No : PMC/12/2023)**
**टप्पा-1: अर्जदाराची सामान्य माहिती (Step-1 : General Information of Applicant)**
**Applicant Detail**

टीप (Note) : * म्हणजे अनिवार्य (means mandatory)

| | |
|---|---|
| अर्ज क्रमांक (Application No) | (अर्ज क्रमांक आपोआप तयार होईल. Application No will be generated automatically.) |
| इंग्रजीत नाव (FullName in English) | * (पूर्णनाव जसेकी पहिलेनाव मधलेनाव आडनाव. Full Name Like Firstname Middlename Lastname.) |
| मराठीत नाव (FullName in Marathi)<br>(नाव इंग्रजी भाषेत टाइप करा, स्पेस बार दाबल्यानंतर ते आपोआप मराठीत रूपांतरित होईल. Type Name in English Language, it will automatically get converted into Marathi after pressing space bar) | * (पूर्णनाव जसेकी पहिलेनाव मधलेनाव आडनाव.मराठी शब्द दुरुस्त करण्यासाठी बॅकस्पेस बटण दाबा. Full Name Like Firstname Middlename Lastname. Press Backspace Button to Correct Marathi Word.) |
| जर नाव बदलले असेल तर इंग्रजीत बदलले पूर्णनाव (If Name Changed, Changed FullName in English) | (पूर्णनाव जसेकी पहिलेनाव मधलेनाव आडनाव. Full Name Like Firstname Middlename Lastname.) |
| वडिलांचे/पालकांचे नाव (Father's/Guardian's FullName) | * (पूर्णनाव जसेकी पहिलेनाव मधलेनाव आडनाव.Full Name Like Firstname Middlename Lastname) |
| आईचे नाव (Mother's FullName) | * (पूर्णनाव जसेकी पहिलेनाव मधलेनाव आडनाव. Full Name Like Firstname Middlename Lastname.) |
| लिंग (Gender) | निवडा (Select) * |

| | |
|---|---|
| वैवाहिक स्थिती (Marital Status) | निवडा (Select) * |
| MCSR (लहान कुटुंबाची घोषणा) नियम, 2005 नुसार तुम्ही पात्र आहात का? (Are you Eligible according to MCSR (Declaration of Small Family) Rules, 2005 ?)<br>टप्पा-5 मध्ये लहान कुटुंब घोषणा अपलोड करणे अनिवार्य आहे (It is mandatory to Upload Small Family Declaration at Step-5) | निवडा (Select) * |
| तुमचा प्रवर्ग ? (Your Category ?)<br>टप्पा-5 मध्ये जेथे लागू असेल तेथे, जात, जात वैधता आणि नॉन-क्रिमी लेयर सारखी प्रमाणपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे. (Where Applicable, it is mandatory to upload Certificates like Caste , Caste Validity and Non-Cremy Layer at Step-5) | निवडा (Select) *<br>महत्वाची टीप (Important Note) : एकदा आपण ऑनलाइन अर्जाचे पैसे भरल्यानंतर प्रवर्ग बदलू नका (Do not Change Category once you make payment of online application).<br>जात (Caste) *<br>पोटजात (Sub-Caste) |
| तुम्हाला कोणत्या प्रवर्गातून अर्ज करायचा आहे ? (From which Category you want to apply ?) | निवडा (Select) * |
| ई-मेल आयडी (Email ID) | |
| पत्रव्यवहाराचा पत्ता (Correspondence Address) | *<br>राज्य (State) : *<br>जिल्हा (District) : *<br>पिन (Pin) : * |
| | ☐ पत्रव्यवहार आणि कायमचा पत्ता एकच आहे का? (Correspondence and Permanent Address is Same?) |
| कायमचा पत्ता (Permanent Address) | *<br>राज्य (State) : *<br>जिल्हा (District) : *<br>पिन (Pin) : * |
| तुमच्याकडे महाराष्ट्राचे वैध अधिवास प्रमाणपत्र आहे का? (Whether You have valid Domicile Certificate of Maharashtra?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * राष्ट्रीयत्व (Nationality) निवडा (Select) * |
| तुम्ही राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे (NHM) कर्मचारी आहात का? (Are you Employee of National health Mission (NHM)?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * |
| जन्मतारीख (Date of Birth)<br>(DD-MM-YYYY Format)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | * |
| अपंग आरक्षण (Differently Abled Reservation?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | अर्जदार अपंग आहे का? (Whether applicant Differently Abled ?) निवडा (Select) *<br>होय असल्यास, तुमच्याकडे SADAREM/वैद्यकीय मंडळाचे अपंगत्व प्रमाणपत्र (किमान 40%) आहे का? (If Yes, Do you have Disability Certificate (Minimum 40%) of SADAREM/Medical Board ?) निवडा (Select)<br>होय असल्यास, अपंगत्वाचा प्रकार? (If Yes, Type of Handicap?) निवडा (Select) |
| माजी सैनिक आरक्षण (Ex-Serviceman Reservation?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | तुम्ही निवृत्त माजी-सैनिक आहात का? (Are you a Retired Ex-Service Man ?) निवडा (Select) *<br>तुमची या अगोदर माजी सैनिक आरक्षणाद्वारे सरकारी सेवेत निवड झाली आहे का? (Are you selected in Government Service through Ex-Serviceman Reservation previously?) निवडा (Select) *<br>तुम्ही निवृत्त अपंग माजी-सैनिक आहात का? (Are you a Differently Abled Retired Ex-Service Man ?) निवडा (Select)<br>एकुन झालेली सेवा (पूर्ण वर्षामध्ये)? (No of Years of Service in Complete Years?) |
| तुम्ही प्रकल्पग्रस्त आहात किंवा प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून आहात? (Are you Project Affected or Dependent on Project Affected Person?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * |
| तुम्ही भूकंपग्रस्त आहात का [घरातील कोणत्याही सदस्याचा मृत्यू असो किंवा भूकंपात कोसळलेले घर सरकारने पुनर्बांधणी केली आहे का]? (Are you Earthquake Affected [Whether death of any family member in the house or the house collapsed in the earthquake has been rebuilt by the Government]?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * |
| तुम्ही पदवीधर / पदविकाधारक पार्ट-टाईम (अंशकालीन) कर्मचारी आहात का? (Are you Graduate / Postgraduate Part-time (Anshakalin) Employee?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * |
| तुम्हाला स्पोर्ट्स कोट्यातून अर्ज करायचा आहे का? (Whether you want to Apply from Sports Quota?)<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * |

| | |
|---|---|
| **अर्जदार अनाथ आहे का? (Whether applicant have Orphan Status?)**<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * |
| **तुम्हाला महिला कोट्यातून अर्ज करायचा आहे का? (Whether you want to Apply from Women Quota?)** | निवडा (Select) *<br>महिला कोट्यातील अर्जासाठी या वर्षासाठीचे वैध नॉन-क्रेमीलेअर प्रमाणपत्र आवश्यक आहे. (Application from women quota required non-cremylayer certificate valid for this year.) |
| **आधार क्र (Aadhaar No)** | |
| **MS-CIT किंवा समतुल्य प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे का? (Has Successfully Completed MS-CIT or Equivalent Training?)**<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करणे बंधनकारक आहे? (It is Mandatory to Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) * |
| **मराठीचे पुरेसे ज्ञान आहे का? (Whether Possesss Adequate Knowledge of Marathi?)**<br>टप्पा-5 मध्ये पुरावा अपलोड करा? (Upload Proof at Step-5?) | निवडा (Select) |

**घोषणापत्र वर क्लिक करा (Click on Declaration)**

☐ मी, याद्वारे, गंभीरपणे आणि प्रामाणिकपणे प्रतिज्ञा करतो की वरील ऑनलाइन अर्जामध्ये केलेले प्रत्येक विधान आणि भरलेली संपूर्ण माहिती माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. मी कोणतीही भौतिक माहिती लपवलेली नाही, तथापि येथे सादर केलेली कोणतीही माहिती फसवी, चुकीची किंवा असत्य आढळल्यास, मी समजतो की माझ्यावर फौजदारी खटला होण्यास जबाबदार असून पदावरील निवड देखील रद्द होण्यास जबाबदार आहे. मी भरतीचे नियम काळजीपूर्वक वाचले आहेत आणि मी त्यांचे पालन करण्यास सहमत आहे. मी याद्वारे या नियमांची संपूर्ण कायदेशीरता, वैधता आणि शुद्धता स्वीकारतो. मला समजते की हा अर्ज सबमिट करून मी या सर्वांची शुद्धता, वैधता आणि/किंवा न्याय्यता स्वीकारली आहे. मी सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याचे वचन घेतो, त्यात अयशस्वी झाल्यास माझा निवडीचा दावा मंजूर केला जाणार नाही. मी दस्तऐवज पडताळणीच्या वेळी तसेच निवड प्रक्रियेच्या वेळी नियमांनुसार सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करण्याचे वचन घेतो, असे न झाल्यास माझा निवडीचा दावा मंजूर केला जाणार नाही असे मला समजते.
(I, hereby, solemnly and sincerely affirm that each and every statement made and the entire information filled in the above online application form is true and correct to the best of my knowledge. I have not concealed any material information, however if any information submitted herein is found fraudulent, incorrect or untrue, I understand that I am liable to criminal prosecution and my selection to the Post is also liable to be cancelled. I have carefully read the rules & regulations of Recruitment and I agree to abide by them. I hereby accept in entirely the legality, validity and correctness of these rules. I understand by submitting this application I have accepted the correctness, validity and/or justifiability of all these and that. I undertake to upload all the required Documents, failing which I understand that my claim for selection shall not be granted. I undertake to submit all the required original certificates at the time of Document Verification as well as at the time of selection process as per the rules, failing which I understand that my claim for selection shall not be granted.)

माहिती साचवा (Save Information) | डॅशबोर्डवर परत जा (Move Back to Dashboard)

## टप्पा-२ : शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम माहिती तपशील

या टप्प्यामध्ये अर्जदाराने सर्व शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम इत्यादीची माहिती नोंदवावी.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
पुणे महानगरपालिका


बाहेर पडणे (Logout)

**जाहिरात क्रमांक : PMC/12/2023 साठी विविध पदांच्या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज**
**(Online Application for Recruitment of various Posts for Advertisement No : PMC/12/2023)**
**टप्पा-2 : शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम माहिती तपशील (Step-2 : Details of Educational/Technical/Professional Course Information)**
अर्जदाराचे नाव (Applicant Name) : AKASH MADHUKAR BHISE (आकाश मधुकर भिसे) - अर्ज क्र (Application No) : PMC/12/2023/1

टीप (Note) : * म्हणजे अनिवार्य (means mandatory). अर्जदाराने शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम माहिती प्रविष्ट करावी आणि "माहिती अद्यावत करा" वर क्लिक करा. अद्यावत माहिती खालील ग्रिडमध्ये पाहिली जाईल. एकापेक्षा जास्त शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम साठी पुनरावृत्ती करा.(Applicant have to Enter Educational/Technical/Professional Course Information & Click on "Update Information". The updated Information will be view in Following Grid. Repeat the Step for more than one Educational/Technical/Professional Course.)

अति महत्त्वाची टीप : अर्जदाराने 10वी, 12वी, पदवी, पदव्युत्तर इत्यादींची सर्व शैक्षणिक माहिती क्रमाने प्रविष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा पद निवडीसाठी अडथळे निर्माण होऊ शकतात. (It is very important for the applicant to enter all the educational information of 10th, 12th, graduation, post graduation etc. in sequence, otherwise it may cause hurdles for the post selection.)

| | |
|---|---|
| परीक्षा स्तर (Examination Level) | 12वीं (12th) * |
| परीक्षा (Examination) | * |
| विशेष विषय (असल्यास) (Specialisation [if Any]) | |
| बोर्ड/युनिवर्सिटी (Board/University) | * |
| उत्तीर्ण वर्ष (Passing Year) | * |



| | |
|---|---|
| एकूण गुण मिळाले (Total Marks Obtained) | प्राप्त गुण उपलब्ध नसल्यास, रिक्त ठेवा (If Obtained Marks not Available, Keep Blank) |
| एकूण गुण (Total Out Of Marks) | एकूण गुण उपलब्ध नसल्यास, रिक्त ठेवा (If Total Out Of Marks not Available, Keep Blank) |
| अंतिम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये गुणांऐवजी ग्रेड अथवा श्रेणी नमूद आहे का ? (Does the Final year certificate mention Grade or Category instead of Marks?) | नाही (No) |
| अंतिम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये गुणांऐवजी ग्रेड अथवा श्रेणी नमूद असल्यास ग्रेड अथवा श्रेणी नमूद करा (If the Final year certificate mentions Grade or Category instead of Marks, mention the Grade or Category) | ग्रेड अथवा श्रेणी नसल्यास, रिक्त ठेवा (If Grade or Category not Available, Keep Blank) |
| अंतिम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये गुणांऐवजी ग्रेड अथवा श्रेणी नमूद असेल तर सबंधित संस्थेकडून प्राप्त प्रमाणपत्रामधील समतुल्य रूपांतरित टक्केवारी प्रविष्ट करा (If the Final year certificate mentions Grade or Category instead of Marks, enter the equivalent converted Percentage in the certificate received from the concerned institution) टप्पा-5 मध्ये सबंधित संस्थेकडून प्राप्त समतुल्य रूपांतरित टक्केवारी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे (It is Mandatory to Upload equivalent converted Percentage certificate received from concerned Institute at Step-5?) | प्राप्त टक्केवारी उपलब्ध नसल्यास, रिक्त ठेवा (If Obtained Marks not Available, Keep Blank) |

माहिती अद्यायावत करा (Update Information) डॅशबोर्डवर परत जा (Move Back to Dashboard)

शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम तपशीलांची यादी (List of Educational/Technical/Professional Course Detail)

टीप: अर्जदार "Delete" वर क्लिक करून विद्यमान शैक्षणिक पात्रता माहिती हटवू शकतो. "Edit" वर क्लिक करून शैक्षणिक पात्रता अपडेट केली जाऊ शकते. (Note : Applicant may delete existing Educational Qualification Information by clicking "Delete". Educational Qualification may Updated by clicking on "Edit".)

Show 10 entries Search:

| Delete | Modify | परीक्षा स्तर (Examination Level) | परीक्षा (Examination) | विशेष विषय (असल्यास) (Specialisation [If Any]) | बोर्ड/युनिवर्सिटी (Board/University) | उत्तीर्ण वर्ष (Passing Year) | एकूण गुण मिळाले (Total Marks Obtained) | एकूण गुण (Total Out Of Marks) | टक्केवारी (Perentage) | गुणांऐवजी ग्रेड अथवा श्रेणी नमूद आहे का ? (Grade or Category instead of Marks) | ग्रेड (असल्यास) (Grade [If Any]) | समतुल्य रूपांतरित टक्केवारी (equivalent converted Percentage) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Delete | Edit | 10th | SSC | | PUNE | 1998 | 540 | 700 | 77.14 | N | | |
| Delete | Edit | 12th | HSC | | PUNE | 2000 | 700 | 800 | 87.50 | N | | |

Showing 1 to 2 of 2 entries First Previous 1 Next Last

१) शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२) ऑनलाईन अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

३) आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. (निकाल घोषीत केल्याचा दिनांक)

४) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी**. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे आवश्यक आहे**. अंतिम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रूपांतर करून ते प्रमाणित करून घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान सादर करावी.

५) **अर्जात एकूण प्राप्त गुण नमुद न करता गुणांची अचुक टक्केवारी नमुद करावी.** शैक्षणिक प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.


६) अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्र/कागदपत्र आपण निवडीस पात्र झाल्यास छानन्नी दरम्यान सादर करणे अनिवार्य राहील. निवड प्रक्रियेच्या छाननी दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका न जुळल्यास व ऑनलाईन फॉर्म मध्ये नमूद केलेली माहिती न जुळल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

७) कंत्राटी पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही “विद्यापीठ अनुदान आयोग” (UGC Approved) मान्यताप्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे. अशाच विद्यापीठातून घेतलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता ग्राह्य धरण्यात येईल.

८) ज्या वैद्यकीय/निमवैद्यकीय पदांकरिता संबंधित वैद्यकीय/निमवैद्यकीय परिषदेची नोंदणी अनिवार्य आहे अशा अर्जदारांनी संबंधित परिषदेकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र छाननी दरम्यान सादर करणे आवश्यक आहे.

## टप्पा-३ : अनुभवाचा तपशील

या टप्प्यामध्ये अर्जदाराने सर्व अनुभवांचा तपशील नोंदवावा.


राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
पुणे महानगरपालिका

बाहेर पडणे (Logout)

जाहिरात क्रमांक : PMC/12/2023 साठी विविध पदांच्या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज
(Online Application for Recruitment of various Posts for Advertisement No : PMC/12/2023)
टप्पा-3 : अनुभवाचा तपशील (Step-3 : Details of Experience Information)
अर्जदाराचे नाव (Applicant Name) : AKASH MADHUKAR BHISE (आकाश मधुकर भिसे) - अर्ज क्र (Application No) : PMC/12/2023/1

टीप (Note) : * म्हणजे अनिवार्य (means mandatory). अर्जदाराने अनुभवाचा तपशील प्रविष्ट करावी आणि "अनुभवाचा तपशील अद्ययावत करा" वर क्लिक करा. अद्ययावत माहिती खालील ग्रिडमध्ये पाहिली जाईल. एकापेक्षा जास्त अनुभवाच्या तपशीलसाठी पुनरावृत्ती करा.(Applicant have to Enter Experience Information & Click on "Update Experience Information". The updated Information will be view in Following Grid. Repeat the Step for more than one Experience Information.)

| | |
|---|---|
| पद (Post Held) | * |
| संस्थेचा प्रकार (Type of Organisation) | महाराष्ट्र निमशासकीय (Maharashtra Semi-Government) * |
| संस्थेचे नाव आणि पत्ता (Organisation Name and Address) | * |
| तारखेपासून (From Date) (DD-MM-YYYY Format) | * |
| तारखेपर्यंत (To Date) (DD-MM-YYYY Format) | * |
| नियुक्तीचे स्वरूप (Nature of the Appointment) | निश्चित वेतनावर (Fix Payment) * |
| दरमहा वेतन तपशील (Monthly Salary Detail) | * |

अनुभव अद्यायावत करा (Update Experience) | डॅशबोर्डवर परत जा (Move Back to Dashboard)

अनुभवाच्या तपशीलांची यादी (List of Experience Detail)

टीप: अर्जदार "Delete" वर क्लिक करून विद्यमान अनुभवाची माहिती हटवू शकतो. "Edit" वर क्लिक करून अनुभवाची माहिती अपडेट केली जाऊ शकते. (Note : Applicant may delete existing Experience Information by clicking "Delete". Experience may Updated by clicking on "Edit".)

Show 10 entries                                        Search:

| Delete | Modify | पद (Post Held) | संस्थेचा प्रकार (Type of Organisation) | संस्थेचे नाव आणि पत्ता (Organisation Name and Address) | तारखेपासून (From Date) | तारखेपर्यंत (To Date) | एकूण अनुभव (Total Experience) | नियुक्तीचे स्वरूप (Nature of the Appointment) | वेतन तपशील (Salary Detail) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Delete | Edit | MEDICAL OFFICER GRADE-A | Maharashtra Semi-Government | NATIONAL HEALTH MISSION | 01-01-2023 | 20-11-2023 | 00 Years, 10 Months, 19 Days | Fix Payment | 60000 PER MONTH |
| Delete | Edit | MEDICAL OFFICER | Corporation | PUNE MAHANAGAR PALIKA | 08-12-2020 | 12-12-2022 | 02 Years, 00 Months, 04 Days | Fix Payment | 45000 PER MONTH |

Showing 1 to 2 of 2 entries                First Previous 1 Next Last

१) अर्ज करीत असलेल्या कंत्राटी पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अतिरिक्त आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्याची दखल घेतली जाणार नाही.

२) अनुभवाचा तपशील नमूद करताना पहिली नियुक्ती कालावधी ते सध्याची नियुक्ती कालावधी या क्रमानेच द्यावा.


३) अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच कार्यालयाचा तपशील फॉर्म मध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

४) अनुभवाचा तपशील नमूद करताना रूजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. दोनही तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास अशा अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही.

५) ज्या कंत्राटी पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाशी संबंधित असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**<u>टप्पा-४ : कोणत्या पदांसाठी अर्ज करावयाचा आहे ?</u>**

या टप्प्यामध्ये अर्जदाराने ज्या पदांना अर्ज भरावयाचा आहे अशी सर्व पदे निवडावी. अर्जदार एका पेक्षा जास्त पदांना अर्ज करू शकेल परंतु प्रत्येक पदाकरिता अर्जदारास शुल्क भरावे लागेल. आणि त्याच प्रमाणात अर्ज शुल्क टप्पा क्रमांक ६ मध्ये भरवायची आहे.




## टप्पा-५ : कागदपत्रे / प्रमाणपत्रे अपलोड करणे-

या टप्प्यात अर्जदाराने अर्जामध्ये नोंदविलेल्या सर्व शैक्षणिक अर्हता/अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे Upload करावयाची आहे. Upload करण्यात येणा-या फाईल चा प्रकार, Size इत्यादी बाबतची माहिती या टप्प्यात समोर दिसेल त्या प्रमाणे Upload करावी.




## टप्पा-६ : अर्ज शुल्काचा ऑनलाइन भरणा-

अर्जदाराने निवडलेल्या पदांच्या प्रमाणात अर्जदाराने फीचा भरणा या टप्प्यात करावा.

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.३००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.२००/- अर्ज शुल्क राहील.

२) माझी सैनिक / दिव्यांग माझी सैनिक यांचेसाठी शुल्क माफ राहील.

३) एकापेक्षा अधिक कंत्राटी पदाकरीता अर्ज करीत असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र शुल्क आकारण्यात येईल आणि एकत्रित शुल्क ऑनलाईन पध्दतीने प्रणालीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या पेमेंट गेटवेच्या (Payment Gateway) माध्यमातून अदा करता येईल.


४) अर्ज शुल्क ना परतावा (Non- Refundable) आहे.

**टप्पा-७ : ऑनलाइन अर्ज प्रस्तुत करा**

टप्पा -१ ते टप्पा -६ पूर्ण झाल्यानंतर टप्पा -७ या लिंक ला क्लिक करून अर्ज प्रस्तुत ( Submit ) केला जाऊ शकेल.

**टप्पा-८: प्रस्तुत केलेल्या अर्जाची प्रिंटआउट घ्या**

अर्ज प्रस्तुत ( Submit ) केल्यानंतर टप्पा - ८ येथून प्रस्तुत ( Submit ) केलेल्या अर्जाची Print काढता येऊ शकेल.




अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचून भरावी. एकदा अर्ज Online प्रस्तुत (Submit) केल्यानंतर भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**ख) वयोमर्यादा :**

१) **दि. १५ मार्च २०२४** रोजी उमेदवाराचे वय प्रत्येक कंत्राटी पदाकरीता जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे. (आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य

अभियान यांचेकडील जा.क्र.राआसो / मनुष्यबळ / वयोमर्यादा - शुद्धीपत्रक / १४८१८-१५१८१ /२०१९, दिनांक २८/०५/२०१९ रोजीचे शुद्धीपत्रक)

२) एमबीबीएस, विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील.

३) रुग्ण सेवेशी संबंधित (उदा.परिचारिका, स्टाफ नर्स, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ई.) पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

५) वय वर्ष ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारिरीक दृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**ग) अर्ज भरण्याबाबतच्या इतर सर्वसाधारण सुचना -**

१) ऑनलाईन अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर करणे आवश्यक आहे.

२) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.

३) अर्जात लिंग,वैवाहिक स्थिती याबाबतची माहिती अचूक नमूद करावी.

४) अर्जामध्ये उमेदवाराने स्वतःचा वैध ईमेल आयडी/पर्यायी ईमेल आयडी, चालू भ्रमणध्वनी क्रमांक/ पर्यायी भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. आवश्यकतेनुसार पात्र/अपात्र यादीमधील निवडीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांना मूळ कागदपत्र पडताळणी संदर्भात देण्यात येणा-या सुचना ईमेलव्दारे देण्यात येतील. तसेच पात्र उमेदवारांपैकी गुणानुक्रमे निवडीस पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे ईमेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहतील व ईमेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. **तसेच कंत्राटी पदभरती बाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि कंत्राटी पदभरती बाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी या कार्यालयाच्या** https://www.pmc.gov.in तसेच https://pmcuhwcrecruitment.maha-arogya.com **संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील. याकरिता वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे देखील बंधनकारक आहे.**

५) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे. असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र (Domicile Certificate) आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान सादर करणे आवश्यक आहे.

६) उमेदवाराने आपला धर्म व जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा. उमेदवार राखीव प्रवर्गात मोडत असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान सादर करावे. राखीव प्रवर्गाच्या उमेदवाराने जात प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारास

अराखीव प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल व त्याला आरक्षणाचा व त्याअनुषंगाने उपलब्ध इतर लाभ घेता येणार नाहीत.

७) इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांनी चालू वर्षाचे आवश्यक नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील.

**<u>च) संगणक अर्हता व इतर –</u>**

१) MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा त्याबाबतचा तपशील नमूद करावा.

**<u>छ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र –</u>**

१) शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.
२) उमेदवाराने आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान या अनुषंगाने प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच ऑनलाईन फॉर्म भरताना सदर लहान कुटुंब प्रमाणपत्र अपलोड करण्यात यावे.
३) सदर लहान कुटुंबाचे प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

**<u>झ) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी–</u>**

१) उमेदवाराने टप्पा क्र.५ मध्ये त्याचे अलीकडील काळात काढलेला सुस्पष्ट फोटो व स्वाक्षरी खालील जागेत उपलोड करावी.

**<u>त्र) निवड प्रक्रिया –</u>**

१) सदर कंत्राटी पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया केवळ गुणांकन पद्धतीद्वारे (Merit) ठरविण्याचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपलिका, पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.
२) सदर निवडसूचित समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| प्रवर्गनिहाय रिक्त पदांची | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|

| संख्या | |
|---|---|
| १ | ३ |
| २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते. |
| १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के |

३) सदर उमेदवारांची निवड गुणानुक्रमे खालील निकषानुसार करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | कंत्राटी पदाकरीता आवश्यक किमान अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात ५० गुण |
| आ | कंत्राटी पदाकरीता आवश्यक अतिरिक्त अर्हता /पदव्युत्तर अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात २० गुण |
| इ | कंत्राटी पदाकरीता आवश्यक अनुभव | प्रत्येक वर्षाकरीता ६ गुण (कमाल ३० गुण) |

४) उपरोक्त निवड प्रक्रियेसंदर्भात मुद्दा क्र.१ अन्वये आवश्यकतेनुसार प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपलिका, पुणे यांचेकडे राहतील, त्यामुळे उपरोक्त नमूद निवड प्रक्रियेत परिस्थिती अनुरूप बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ट) सर्वसाधारण सुचना-**

१. उपलब्ध करुन देण्यात येणा-या लिंकव्दारे प्राप्त होणाराच अर्ज उमेदवारांनी भरणे आवश्यक आहे.

२. सदर कंत्राटी पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी https://www.pmc.gov.in तसेच https://pmcuhwcrecruitment.maha-arogya.com या संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

३. जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त कंत्राटी पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची असून ती पुणे महानगरपालिकेची नियमित पदे नाहीत. या पदांचा पुणे महानगरपालिकेच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या नियमित पदावर समायोजन करण्याची मागणी करु शकणार नाही.

५. जाहीरातीत नमूद केलेले कंत्राटी पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.
६. शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकारी (Retired Person) यांना (आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचेकडील क्र.राआसो/आस्था/सेनिक मानधन/३२५६१-७९१/२०१६ दि.०६.०८.२०१६ नुसार मानधनाची अदायगी करण्यात येईल.
७. अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.
८. प्रतीक्षा यादीची मुदत १ वर्षपर्यंत राहील.
९. सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतीक्षा यादीतील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.
१०. नियुक्ती आदेश निर्गमित केल्यानंतर उमेदवारांच्या पदस्थापनेतील ठिकाणांमध्ये कोणताही बदल होणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
११. ऑनलाईन फॉर्म भरण्यांची अंतिम तारीख दि. ३१ मार्च २०२४ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत असेल.
१२. सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व/वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपलिका, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.
१३. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने काही शंका / तक्रार असल्यास पोर्टल च्या Dashboard मधील “तुमची शंका/तक्रार काही असेल तर येथून मांडा (Raise your Query/Grievance if any from Here)” या लिंकवर क्लिक करून शंका / तक्रारीची नोंद करू शकाल.

---